पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

● वर्ष १ ● अंक १०० ● शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com





**सुविचार**

व्यस्त रहा म्हणजे तुम्हाला दु:खी होण्याची वेळ मिळणार नाही..!

## »थोडक्यात

### 20 वर्षीय प्रशिक्षणार्थी अग्निवीराने अकस्मात आयुष्य संपवले!

नाशिक : भारतीय सैन्य दलात नुकत्याच भरती झालेल्या २० वर्षीय प्रशिक्षणार्थी अग्निवीराने नाशिकरोड येथील आर्टिलरी सेंटरच्या बॅरेकमध्ये आयुष्य संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अश्विन एम . (वय २०, मूळ रा. केरळ) असे मृत अग्निवीराचे नाव आहे. त्याचे सहा महिन्यांपैकी दहा आठवडे प्रशिक्षण पूर्ण झाले होते. धक्कादायक निर्णयामागील कारण अद्याप अस्पष्ट असून उपनगर पोलिसांत याबाबत आकस्मिक मृत्यू नोंदवून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, गुरुवारी आर्टिलरी सेंटरमधील अशोक चक्र गेटजवळील आर्मी बॅरेकमध्ये अश्विनने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.

---

### भाजप प्रवेशानंतर 2 दिवसांत माजी आयएएस अधिकाऱ्याला उमेदवारी!

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षानं आसामच्या नगाव लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केला आहे. माजी आयएएस अधिकारी देबाशिष शर्मा यांना भाजपनं निवडणुकीचं तिकीट दिलं आहे. पोटनिवडणूक ६ ऑक्टोबरला होणार असून ९ ऑक्टोबरला मतमोजणी होईल. विशेष म्हणजे देबाशिष शर्मा यांनी ३ सप्टेंबरला स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. त्याआधी ते नगाव जिल्ह्याचे आयुक्त होते. ३ सप्टेंबरला त्यांनी पदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला. ८ सप्टेंबरला त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यानंतर दोनच दिवसांनी भाजपनं त्यांना नगाव मतदारसंघातून लोकसभेची उमेदवारी दिली आहे.

---

### ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ला!

जालना : ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तीन ते चार तरूणांनी हॉटेलमध्ये हाकेंवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर ओबीसींच्या न्यायासाठी हाके यांनीही आंदोलन केले. हल्ल्यानंतर बोलताना लक्ष्मण हाके यांनी म्हटले की, ओबीसीचा आवाज दाबण्याचा हा हल्ल्याच्या माध्यमातून प्रयत्न होता. हा माझ्यावर झालेला अकरावा हल्ला होता आणि तो भ्याड हल्ला होता हे सगळे कार्यकर्ते जरांगेचे होते. लक्ष्मण हाकेचा जीव गेला तरी आम्ही ओबीसीचा आवाज थांबवणार नाही. ओबीसीच्या नेत्यांवर हल्ले करून शिवीगाळ करून तू आरक्षण घेऊ शकत नाहीत.

# दुष्काळाचा मुद्दा महत्त्वाचा : चंद्रशेखर बावनकुळे

## आज सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक, जरांगे पाटलांनी गणेशोत्सवात मुंबईला आंदोलन करू नये

प्रतिनिधी | १२ ऑगस्ट

**नागपूर** : सध्याच्या घडीला मनोज जरांगे पाटील हे काय करतात किंवा त्यांच्या भूमिकेपेक्षा राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीचा मुद्दा महत्त्वाचा असल्याचे मत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांमध्ये थोडा कमी पाऊस आहे. पीक करपत आहे. काल सर्व जिल्हाधिकाऱ्यांची मी बैठक घेतली. आज चार वाजता पुन्हा सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते शनिवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. मुंबईमधील आंदोलन म्हणजे मुंबईकरांसाठी कायदा सुव्यवस्था संदर्भात कठीण आहे. याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय पाहता मुंबईत कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. राज्यातील सर्व आंदोलकांना विनंती राहील की, या काळात मुंबईत आंदोलन करणे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. ओबीसी किंवा मराठा समाज असेल कोणाचाही हक्क डावलता येणार नाही.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या दोघांनी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. आमचे सरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेत काम करत आहे. त्यामुळे सरकारला थोडं वेळ दिला गेला पाहिजे. मुंबई किंवा महाराष्ट्रात गणेश उत्सव हा देशातील सर्वात मोठा सण आहे. या काळात कोणी आंदोलन करू नये, असे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

### मुख्यमंत्री-महसूलमंत्र्यांची बंदद्वार चर्चा!

आज मुख्यमंत्री नागपूरवरुन थेट दिल्लीला जाणार आहेत. काही महत्त्वाच्या कामासाठी ते दिल्लीला जाणार असल्याचे सांगितले जात आहे. दिल्ली ते भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांची भेट घेण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्र्यांच्या दिल्ली दौऱ्यापूर्वी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची भेट घेतली. चंद्रशेखर बावनकुळे आणि मुख्यमंत्री यांची नागपुरातील रामगिरी बंगल्यावर बैठक पार पडली. या दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातील दुष्काळ, शेतकरी प्रश्न, मनोज जरांगे उपोषण यासर्व मुद्यांवर चर्चा झाली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या भेटीमागचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही.

### येणाऱ्या कॅबिनेटमध्ये संपूर्ण आढावा मांडणार!

कॅबिनेटमध्ये मुख्यमंत्र्यांनी मला आणि चीफ सेक्रेटरी ना सर्व राज्याचे तातडीने सर्वेक्षण सुरू करण्याचं सूचना केले आहे. जिल्ह्यात काय उपाययोजना करता येईल यासाठी मुख्यमंत्र्यांनी सूचना केल्या आहे. राज्याची पूर्ण परिस्थिती समोर आल्यानंतर येणाऱ्या कॅबिनेटमध्ये आम्ही ती मांडू. या मंगळवारी राज्यातील परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्र्यांना देणार. मी आज जिल्हाधिकाऱ्यासोबत चर्चा करणार. त्या त्या जिल्ह्याचे पालकमंत्री आणि संपूर्ण यंत्रणा दौरा करणार आहे मी देखील काही ठिकाणी जाणार आणि येणाऱ्या कॅबिनेटमध्ये संपूर्ण आढावा मांडणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

# गणेशोत्सवावर महागाईचे सावट!

प्रतिनिधी | १२ ऑगस्ट

**अकोला:** विघ्नहर्त्या श्री गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले असताना शहरातील प्रमुख बाजारपेठा सजल्या असल्या, तरी महागाईच्या वाढत्या झळांमुळे यंदाच्या गणेशोत्सवाच्या खरेदीवर स्पष्ट परिणाम दिसून येत आहे. अकोल्यातील प्रसिद्ध गांधी रोड, टिळक रोड आणि मध्यवर्ती बाजारपेठेत पूजेचे साहित्य, सुगंधी फुले, फळे, आकर्षक मखर आणि सजावटीच्या साहित्याची दुकाने थाटली गेली असली, तरी ग्राहकांची अपेक्षित गर्दी गायब असल्याने व्यापाऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कच्चा माल आणि वाहतूक खर्च वाढल्याने गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या प्रत्येक वस्तूच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे.सुबक कागदी व थर्मोकोल-मुक्त इको-फ्रेंडली मखरांच्या दरात वाढ झाल्याने बजेट कोलमडले आहे. पूजा साहित्या संचापासून ते धूप, कापूर आणि सुगंधी द्रव्यांच्या किंमती उंचावल्या आहेत.सणाच्या तोंडावर बाजारात आवक कमी असल्याचा बहाणा करत फळे व फुलांचे दर भडकले आहेत. परिणामी, सर्वसामान्य नागरिक सणाचा उत्साह कायम ठेवत मोठ्या प्रमाणावर वस्तू खरेदी करण्याऐवजी केवळ अत्यंत आवश्यक असलेल्या साहित्याचीच मर्यादित खरेदी करताना दिसत आहेत. सण-उत्सवाच्या काळात अकोल्याच्या बाजारपेठेत होणारी करोडोंची उलाढाल यंदा काहीशी मंदावली आहे. दुकानांमध्ये मालाचा साठा भरपूर असला, तरी ग्राहकांची खरेदी क्षमता घटल्याने व्यापाऱ्यांना मोठा फटका बसण्याची भीती आहे. दरम्यान, येत्या दोन-तीन दिवसांत आणि प्रत्यक्ष श्रींच्या स्थापनेच्या दिवशी बाजारपेठेत खरेदीचा टप्पा अधिक गती पकडेल, अशी आशा व्यापारी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

> 'बाजारात सर्व प्रकारचे नवनवीन सजावटीचे साहित्य उपलब्ध आहे, परंतु महागाईमुळे ग्राहक हात राखून खर्च करत आहेत. पूर्वीसारखी एकदम खरेदी न करता लोक अत्यंत विचारपूर्वक साहित्य घेत आहेत.'
>
> **— स्थानिक व्यापारी, गांधी रोड**

पश्चिम विदर्भातील अग्रगण्य वृत्त वाहिनीचा मुंबई, पुण्यासह

# आरआरसीचा संपूर्ण महाराष्ट्रभर विस्ताराचा संकल्प

## संस्थापक बंडूभाऊ देशमुख व कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांचे प्रतिपादन
## आरआरसी नेटवर्कच्या रौप्य महोत्सवी वाटचालीचा भव्य शुभारंभ

प्रतिनिधी | १२ ऑगस्ट

**अकोला** : विदर्भाच्या माध्यम विश्वात आपल्या निष्पक्ष, धाडसी आणि लोकाभिमुख पत्रकारितेचा ठसा उमटवणाऱ्या 'आरआरसी समूहा'च्या २५ व्या (सिल्वर जुबिली) वर्धापन दिन सोहळ्याचा शुभारंभ शुक्रवारी, ११ सप्टेंबर रोजी अत्यंत दिमाखात पार पडला. पुढील काही दिवस हा वर्धापन दिन सोहळा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जाणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत एकभव्य दिव्य सोहळा लवकरच



अकोल्यात आयोजित करण्यात येणार आहे. शुक्रवारी गांधी चौक स्थित आर आर सी समुहाच्या मध्यवर्ती कॉर्पोरेट ऑफिसमध्ये विविध क्षेत्रांतील सामाजिक, राजकीय व व्यावसायिक क्षेत्रांतील मान्यवरांच्या आणि हितचिंतकांच्या आग्रही उपस्थितीत केक कापून वर्धापन दिनाचा बिगुल वाजवण्यात आला. या विशेष प्रसंगी आयोजित संवाद सत्रात प्रसिद्ध आरजे अजिंक्य देशमुख यांनी नेटवर्कचे संस्थापक संचालक श्री प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख आणि कार्यकारी संचालक श्री पंकज देशमुख यांच्याशी संवाद साधत आरआरसी नेटवर्कच्या २५ वर्षांच्या ऐतिहासिक आणि आव्हानात्मक प्रवासाचा पट उलगडला. अत्यंत खेळीमेळीच्या, उत्साहपूर्ण आणि कौटुंबिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमानंतर, लवकरच राज्यातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत आरआरसी नेटवर्कचा भव्य-दिव्य 'रौप्य महोत्सवी सोहळा' दणक्यात साजरा केला जाणार आहे.

### १०० कोटी जनतेपर्यंत पोहोचण्याचे ध्येय: पंकज देशमुख

प्रभावी कार्यशैलीचे धनी, उत्तम व्यवस्थापक असलेले कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी भविष्यातील ध्येयधोरणांवर प्रकाश टाकला. 'स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर 'आपल्यापुढे कोणी नाही' हा आत्मविश्वास हवाच, परंतु त्यासोबतच स्वतःचे घर आणि संस्था सुखी व शांत ठेवणे गरजेचे आहे. आरआरसीचे हे सुवर्णयश सर्व कर्मचाऱ्यांना समर्पित आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले. परदेशातील शिक्षण व अनुभव पाठीशी असल्याने डिजिटल युगाची पावले ओळखून त्यांनी युट्यूबच्या माध्यमातून आरआरसीला नवी दिशा दिली. आजघराला तब्बल अडीच लाख दर्शक या चॅनेलशी जोडले गेले आहेत. अमरावती आणि यवतमाळ येथील यशस्वी विस्तारानंतर आता लवकरच मुंबई व पुणे येथे नवीन कॉर्पोरेट कार्यालये सुरू करून 'आरआरसी न्यूज' आणि 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात नेटवर्कचा विस्तार करण्यात येणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या कावड यात्रेच्या थेट प्रक्षेपणाला लाखो प्रेक्षकांनी दिलेल्या पसंतीबद्दल त्यांनी आभार मानले. दर महिन्याला दहा कोटी लोक आर आर सी न्यूज विविध सोशल मिडिया प्लॅटफार्मवर पाहतात. हा टप्पा १०० कोटी जनतेपर्यंत पोहोचण्याचे ध्येय नक्कीच साध्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### ऑपरेटर व कर्मचारी हेच आरआरसीचे खरे आधारस्तंभ: बंडूभाऊ देशमुख

आपल्या भावना व्यक्त करताना संस्थापक संचालक बंडूभाऊ देशमुख यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, '२००१ मध्ये अतिशय छोट्या स्वरूपात न्यूज चॅनेलची पायाभरणी झाली. २००३ पर्यंत संपूर्ण तांत्रिक सेटअप उभा करून 'एसीएन'चे अधिग्रहण केले. त्यानंतर २००८ व २००९ च्या काळात 'सिटी चॅनेल'ची यशस्वी सुरुवात केली. २०१० मध्ये श्रीराज राजेश्वराच्या पावन नावाने आपल्या सर्व कन्स्ट्रक्शन व केबल व्यवसायाचे 'आरआरसी' असे नामांतर केले.' फायबर नेटवर्क आणि सेट-ऑफ बॉक्सच्या आधुनिक क्रांतीनंतरही पश्चिम विदर्भात आरआरसीचे वर्चस्व अबाधित राहिल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. 'माझ्यासाठी संपूर्ण स्टाफ महत्त्वाचा आहेच, पण माझ्या नेटवर्कला घराघरांत पोहोचवणारे सर्व केबल ऑपरेटर माझ्यासाठी प्रथम व सर्वाधिक महत्त्वाचे आहेत. त्यांच्या पाठींब्यामुळेच हा २५ वर्षांचा टप्पा शक्य झाला,' असे सांगतानाच २०१६ पासून पंकज देशमुख हा वारसा अत्यंत समर्थपणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन पुढे नेत असल्याबद्दल त्यांनी सार्थ अभिमान व्यक्त केला.

# ही अंतिम निर्णयाची शेवटची लढाई - जरांगे

प्रतिनिधी | १२ ऑगस्ट

**अंतरवाली सराटी** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे सलग १५ दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आज राज्यव्यापी बैठकीत मोठी घोषणा केली. ही आपल्या हक्काची आणि अंतिम निर्णयाची शेवटची लढाई आहे. त्यामुळे आता माघार नाही, आपले मुंबईला जायचे फायनल झाले आहे, असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मुंबईला जाण्यासाठी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाचा संपूर्ण मार्ग आणि मुक्कामही निश्चित केला आहे. या भव्य मोर्चाचा पहिला मुक्काम बीडमधील पाटोदा, दुसरा अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, तिसरा पुण्यातील हडपसर आणि चौथा मुक्काम थेट खोपोली येथे असणार आहे. या सर्व टप्प्यांवरून ताकद वाढवत हा मोर्चा राज्याच्या राजधानीकडे सरकणार आहे. खोपोलीतील मुक्कामानंतर मराठा समाज थेट मुंबईतील आझाद मैदानात धडकणार आहे. आझाद मैदानात पोहोचल्यानंतर तिथेच आमरण उपोषण सुरू करण्याची ठाम भूमिका जरांगे यांनी जाहीर केली.

# सराफाच्या गाडीची डिक्की उघडून साडेनऊ लाखांची रोकड लांबवली

प्रतिनिधी | १२ ऑगस्ट

**अकोला** : शहरात वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्याचे आव्हान पोलिसांसमोर असतानाच, सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याची एक खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. 'प्रणव ज्वेलर्स'चे संचालक परेश चंदुलाल सराफ (५५) यांची मोपेड उघडून चोरट्यांनी तब्बल ९ लाख ५० हजार रुपयांची रोकड आणि तिजोरीच्या चाव्या असलेली बॅग लंपास केली. या घटनेमुळे व्यापारी वर्गात प्रचंड भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता दुकान बंद केल्यानंतर सराफ यांनी दिवसभराची रोकड व चाव्या आपल्या टीव्हीएस ज्युपिटर मोपेडच्या (MH 30 AM 2852) डिक्कीत ठेवल्या. ते घरानजीकच्या 'मॅक्स क्लोदिंग स्टोअर'समोर गाडी पार्क करून खरेदीसाठी आत गेले. याच संधीचा फायदा घेत दोन अज्ञात भामट्यांनी डिक्की उघडून रोकड पळवली. तक्रारदाराने डिक्की तपासली असता चोरीचा प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने सिव्हिल लाइन्स पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांन्वये दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली असून चोरट्यांचा माग काढण्यासाठी पथके रवाना केली आहेत.









### आकाश पाळण्याच्या बेरिंगमध्ये केस अडकल्याने डोक्याची चामडी निघाली!

**यवतमाळ** : सणासुदीच्या काळात यात्रेचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर अत्यंत भयंकर प्रसंग ओढवल्याची घटना यवतमाळ जिल्ह्यातून समोर आली आहे. महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील यात्रेत आकाश पाळण्यात बसलेल्या एका महिलेचे केस फिरत्या बेरिंगमध्ये अडकले. पाळण्याचा वेग जास्त असल्याने अवघ्या काही सेकंदात या महिलेचे केस जोराने खेचले गेले आणि केसांसह त्यांच्या डोक्याची चामडीच उपटून निघाली. या काळजाचा ठोका चुकवणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. फुलसावंगी येथील पुणेश्वर मंदिराच्या पायथ्याशी तान्हा पोळ्याच्या निमित्ताने मोठी यात्रा भरली होती. या यात्रेचा आनंद घेण्यासाठी बाली मारोती टाळीकोटे या महिला आल्या होत्या. त्या यात्रेतील आकाश पाळण्यात बसल्या.

# दोन गंभीर तक्रारींची पोलीस अधीक्षकांनी घेतली दखल!

## अल्पवयीन मुलावरील प्रकरणात एफआयआरची मागणी, इतर आरोपाचीही चौकशी करा

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**अकोला :** शिवसेना कायदे विभागाच्या माध्यमातून जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याकडे दोन स्वतंत्र गंभीर तक्रारी निवेदनाद्वारे सादर करण्यात आल्या. या दोन्ही प्रकरणांची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षकांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याची माहिती आहे.

पहिल्या निवेदनात वेदांत विक्रांत वाघमारे (१७) या अल्पवयीन मुलासंदर्भातील प्रकरणात खदान पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या एनसीआर क्रमांक १२९९/२०२६ बाबत आक्षेप नोंदविण्यात आला आहे. प्रकरणात लागू होणाऱ्या पोक्सो अधिनियम २०१२ मधील कलम १२, किशोर न्याय अधिनियम २०१५ मधील कलम ७५ तसेच बीएनएस मधील संबंधित कलमांनुसार एनसीआर ऐवजी एफआयआर दाखल करून निष्पक्ष तपास करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



दुसऱ्या निवेदनात शिवसेना शहरप्रमुख रमेश गायकवाड यांनी पोलीस अंमलदार श्याम श्रीराम शर्मा व त्यांच्या मुलाविरुद्ध गंभीर आरोप केले आहेत. १६ ग्रॅम सोन्याची चैन जबरदस्तीने काढून घेणे, मारहाण, जीवे मारण्याची धमकी, तक्रार दडपण्याचा प्रयत्न तसेच घटनेचे ण्ऊन्र् पुरावे नष्ट केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणात बीएनएस मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करून निष्पक्ष तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे.दोन्ही निवेदनांमध्ये संबंधित पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, तक्रारींची योग्य नोंद घेऊन कायद्यानुसार कारवाई करावी आणि उपलब्ध पुराव्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनांची पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तपास व आवश्यक कायदेशीर कारवाईचे निर्देश दिल्याने, आता या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे. यावेळी अश्विन नवले जिल्हा प्रमुख, रेखाताई राऊत जिल्हाध्यक्ष, माधुरीताई वाघमारे, जिल्हाध्यक्ष शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना, रेखाताई वारके जिल्हाध्यक्ष ओ बि सी सेल, निशाताई ग्यारल महानगर अध्यक्ष, रमेश गायकवाड शहर प्रमुख ॲड. पवनेश अग्रवाल विधिसेल जिल्हा प्रमुख, राजेश दांडेकर उपशहर प्रमुख, लता सुतार, रंजना रंभेकर, जिल्हा उपाध्यक्ष, उज्वालाताई बावस्कर जिल्हा संघटक, माधुरीताई फुरसुंले जिल्हा सचिव, नम्रता निचळे, अकोला तालुका अध्यक्ष, प्रियंका जाधव पातुर तालुका अध्यक्ष, कल्पनाताई बिडवे, विभागीय अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ, विनायकराव पवार राष्ट्रीय उपाध्यक्ष, संजय सूर्यवंशी जिल्हाध्यक्ष अकोला, प्रदीप लुगडे महानगर अध्यक्ष अखिल भारतीय मराठा महासंघ अकोला. पुष्पा कांबळे, आकाश हिरोळे विभागीय अध्यक्ष यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# लाखपुरीत घरात घुसून महिलेला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

## शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण; हात-पाय मोडण्याची धमकी दिल्याचा आरोप

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील लाखपुरी येथे घरगुती वादातून एका २९ वर्षीय महिलेच्या घरी जाऊन शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी दोन महिलांसह तिघांविरुद्ध मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोशनी प्रविण जोगी (वय २९ रा. लाखपुरी) या ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घरी असताना आरोपी रंजीता राजेंद्र गाढवे (रा. भातकुली, जि. अमरावती) व सोनु अनिल तालन (रा. अकोट, जि. अकोला) या त्यांच्या घरी आल्या. 'तू माझ्या भावासोबत वाद करतेस,' असे म्हणत दोघींनी फिर्यादीला शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. त्यानंतर आरोपी क्र. १ हिने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. झटापटीत खाली पडल्याने फिर्यादीच्या पायाला तसेच डाव्या हाताला दुखापत झाली.

दरम्यान, आरोपी प्रविण हिम्मत जोगी (रा. लाखपुरी) हा दारूच्या नशेत घरी आला. त्यानेही शिवीगाळ करून 'तू घरात राहू नकोस; घरात राहशील तर तुझे हातपाय मोडून टाकीन,' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले.

वैद्यकीय प्रमाणपत्र व फिर्यादीच्या जबाबावरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी कलम ११७(२), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार दीपक महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली

## पिक परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांना सादर
## खरिप उत्पादनात 50 टक्के घट होण्याची शक्यता

**अकोला :** खरिप हंगामातील पाऊस, पेरणी आणि पीक परिस्थितीचा सविस्तर अहवाल जिल्हा प्रशासनाने गुरुवार, १० सप्टेंबर रोजी कृषी आयुक्त, पुणे यांच्याकडे सादर केला आहे. जिल्ह्यातील प्रतिकूल हवामान आणि पावसातील मोठ्या खंडामुळे खरिप पिकांच्या उत्पादनात सुमारे ५० टक्के घट होण्याचा अंदाज अहवालातून व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे आता शासनाकडून कोणता निर्णय घेतला जातो, याकडे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात यंदा चार लाख २६ हजार ६६९ हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी करण्यात आली आहे. मात्र, पावसाने दडी मारल्याने अनेक भागांतील पिकांची अवस्था बिकट झाली आहे. कपाशीची पातेगळ होऊन झाडे सुकण्याच्या अवस्थेत असून पिकांची वाढ खुंटली आहे. तुरीचे पीकही सुकण्याच्या मार्गावर आहे. काही भागांत सोयाबीनवर येलो मोझॅकचा प्रादुर्भाव झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, ९ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीची बैठक झाली. या बैठकीत जिल्ह्यातील पाऊस, पिकांची स्थिती आणि पावसातील खंड यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यानंतर पीक परिस्थितीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला.

१ जून ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात ३७९.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सरासरी पावसाच्या तुलनेत जिल्ह्यात केवळ ५४ टक्के पाऊस झाला आहे. जिल्ह्यातील सहा तालुक्यांमधील १३ महसूल मंडळांत ५० टक्क्यांच्या आत पाऊस झाल्याचे अहवालात नमूद आहे.

## नासाच्या जागतिक मंचावर अमोल अग्रवाल यांची झेप

प्रतिनिधी १२ सप्टेंबर



**अकोला :** येथील रामनगर निवासी व सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी तथा अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे सक्रिय कार्यकर्ते ओमप्रकाश अग्रवाल यांचे सुपुत्र अमोल अग्रवाल यांची नासा स्पेस ॲप्स चॅलेंज २०२६ साठी ग्लोबल नेविगेटर म्हणून निवड झाली आहे. जगभरातील निवडक ७८ मध्ये अमोल यांचा समावेश होणे हे अकोल्यासह देशासाठी अभिमानाची बाब आहे.

ग्लोबल नेविगेटर म्हणून अमोल अग्रवाल नासा स्पेस ॲप्स च्या ग्लोबल ऑर्गनायझिंग टीम सोबत कार्य करणार आहेत. ते आपल्या अनुभव व विशेष कौशल्याच्या आधारे स्पर्धकांना मार्गदर्शन करतील आणि नासा तज्ज्ञ तसेच जगभरातील अर्थ आणि स्पेस सायन्सशी संबंधित शास्त्रज्ञ, तंत्रज्ञान तज्ज्ञ, इनोव्हेटर्स आणि समस्या सोडविण्याच्या जागतिक समुदायाशी जोडले जातील.

अमोल यांची भूमिका केवळ मार्गदर्शनापुरती मर्यादित नसून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर तयार करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या परीक्षणाची व मूल्यमापनाची महत्त्वाची जबाबदारीही देण्यात आली आहे.

## पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी वृषभराज रुद्रायणी देवीच्या चरणी



**बार्शीटाकळी :** बार्शीटाकळी पासून दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर उंच डोंगरावर माता रुद्रायणीचे जागृत देवस्थान आहे. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी बैलपोळ्याची यात्रा भरते. विशेष म्हणजे बैलं साडेतीनशे पाय-या चढतात आणि मातेच्या चरणी नतमस्तक होतात. हजारो लोक हा सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते.

बार्शीटाकळी गावातील सर्व लोक आपापले बैल सजवून मां रुद्रायणी गडावर आणतात. साडेतीनशे पाय-या चढताना भाविकांची दमछाक होते. तिथे बैलांना तर एकेक पाय टाकून गड चढावा लागतो.

# मूर्तिजापूर तालुक्यात उशिरा आलेल्या पावसाने दिलासा; मात्र सोयाबीनला मोठा फटका

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

### कुरूम, मधापूरी, कवठा, खिनखिनीसह परिसरात जोरदार हजेरी



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील कुरूम, मधापूरी, कवठा, खिनखिनी, जामठी आणि नवसाळ या महसुली मंडळांत आणि परिसरात शुक्रवारी जोरदार पावसाने दमदार हजेरी लावली. दीर्घ प्रतीक्षेनंतर आलेल्या या पावसामुळे कापूस ,तूर पिकास मदत झाली असून बळीराजा सुखावला आहे. मात्र, पावसाला झालेला अतिविलंब आणि कोरड्या पडलेल्या जमिनीमुळे हलक्या व उतार माथ्यावरील सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे.

### उतार माथ्यावरील पिके करपली, उत्पादन बुडाले

ऑगस्टच्या उत्तरार्धात आणि सप्टेंबरच्या सुरुवातीला पावसाने दिलेली दीर्घ ताण आणि कडक उन्हामुळे हलक्या व उतार माथ्यावरील जमिनीतील सोयाबीनचे पीक वाचवणे कठीण झाले. शुक्रवारी पाऊस झाला असला तरी, तोपर्यंत हलक्या जमिनीतील पिके पूर्णपणे वाळून गेली होती. त्यामुळे या भागातील सोयाबीनचे उत्पादन पूर्णपणे बुडाले असून शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.

### काळीच्या शेतातील पिकांना संजीवनी

दुसऱ्या बाजूला, काळीच्या आणि पाण्याचा निचरा सावकाश होणाऱ्या भारी जमिनीत ओलावा टिकून राहिल्याने तेथील पिकांची अवस्था काहीशी बरी आहे. शुक्रवारी झालेल्या जोरदार पावसाने या पिकांना मोठी संजीवनी मिळाली आहे. मात्र, शेंगा भरण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात पावसाचा खंड पडल्यामुळे दाण्यांचा आकार बारीक राहिला आहे. परिणामी, काळीच्या शेतात पिके उभी असली तरी एकंदरीत ५० टक्के उत्पादनात घट निश्चित मानली जात आहे.

### शेतकऱ्यांकडून पंचनाम्यांची मागणी

हा पाऊस विहिरी, बोअरवेल आणि भूगर्भातील पाणीपातळी वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणार नाही, सोयाबीनच्या मुख्य पिकाचे झालेले नुकसान भरून निघणारे नाही. शासनाने तात्काळ परिस्थतीचे गांभीर्य लक्षात घेऊन बाधित गावांमध्ये महसूल व कृषी विभागातर्फे नुकसानीचे पंचनामे करावेत आणि पीडित शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी या परिसरातील बळीराजाकडून केली जात आहे.

## सोनोरीतील घरकुल आणि रस्त्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे

**मुर्तीजापूर :** तालुक्यातील सोनोरी ग्रामपंचायत हद्दीत अनेक गरीब व गरजू नागरिक आजही हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत आहेत. डोक्यावर सुरक्षित छप्पर नसताना अनेक कुटुंबांना प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगावे लागत आहे. अशा पात्र लाभार्थ्यांची शासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि घरकुल योजनेच्या माध्यमातून त्यांना हक्काचे घर उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सोनोरीचे माजी सरपंच सुमित राऊत यांनी केली आहे.



राहण्यासाठी योग्य घर नसलेल्या कुटुंबांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांची वस्तुस्थिती प्रशासनाने जाणून घ्यावी. पात्र लाभार्थ्यांचे तातडीने पंचनामे करून घरकुल मंजुरीची प्रक्रिया गतिमान करावी, अशी अपेक्षा राऊत यांनी व्यक्त केली.

सोनोरी ग्रामपंचायत परिसरातील काही भागांमध्ये रस्त्यांची अवस्था समाधानकारक नसल्याने नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या समस्येत अधिकच भर पडत असून, चिखल, खड्डे आणि खराब रस्त्यांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे.

## 'पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धा 2026'चे आयोजन

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**अकोट :** स्वच्छ सर्वेक्षण २०२६-२७, माझी वसुंधरा अभियान तसेच पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी अकोट नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नागरिकांसाठी 'पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा राबविण्यात येत असून नागरिकांना विविध हरित उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या नागरिकांनी शाडू किंवा नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तीचा वापर करणे, घरच्या घरी निर्माल्य व फुलांचे कंपोस्टिंग करणे, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळून टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक सजावट करणे, विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा वापर करणे, ओला व सुका कचरा विलगीकरण करून घंटागाडीला देणे, एलईडी अथवा सौरऊर्जेचा वापर करून ऊर्जा बचत करणे, परिसरात वृक्षारोपण व संगोपन करणे, सीड बॉल तयार करून नगर परिषदेकडे जमा करणे तसेच पर्यावरण विषयक 'हरित शपथ' (E-Pledge) घेऊन त्याचे प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित आहे. या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नसून नागरिकांना प्रथम क्रमांकासाठी २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये अशी आकर्षक रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवावी : अक्षय राऊत

प्रतिनिधी १२ सप्टेंबर



**अकोट :** शिक्षक दिनानिमित्त सुप्रसिद्ध समाजसेवी संघटन सिल्वर फाउंडेशन तर्फे तालुक्यातील आदर्श शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून इंडियन स्पीकर फोरमचे वक्ते अक्षय राऊत अकोला यांनी शिक्षकांनी विद्यार्थ्यांत नैतिक मूल्ये आणि देशप्रेमाची बीजे रुजवावी असे आवाहन केले. शिवाजी विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभाकर पांडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी जिप सदस्य गोपाल कोल्हे यांच्यासह मंचावर अनिल पालेकर, संजय वालसिंगे, रवींद्र कापसे, सुबोध कराळे, महिला मंडळ अध्यक्ष सौ. उज्वलाताई भिसे व सौ रुक्मिणी चौखंडे यांची उपस्थिती होती.

सत्कारमूर्ती शिक्षकांनी सुद्धा यापूर्वी आमचा कधीही असा सत्कार झालेला नाही असे सांगितले.

संपूर्ण अकोट तालुक्यामधून २१आदर्श कार्य करणाऱ्या शिक्षकांची निवड करण्यात आली होती. या कार्यक्रमांमध्ये आदर्श शिक्षकांना सहपरिवार आमंत्रित करून. त्यांचा शाल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांचे शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला शिक्षकांनी सहपरिवार व सिल्वर फाउंडेशन सदस्यांनी भरगच्च उपस्थिती दिली होती. प्रास्ताविक सुबोध कराळे तर संचालन प्रकाश गायकी यांनी केले. सत्कार कार्यक्रमाचे संचालन मेहून नगदीय व प्रभाकर नागरे यांनी केले. व आभार रवींद्र कापसे यांनी केले.

# हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील एक महान गायक पंडित सवाई गंधर्व!

### सवाई गंधर्व यांचा आज स्मृतिदिन

पंडित सवाई गंधर्व यांचे मूळ नाव रामचंद्र गणेश कुंदगोळकर होते. ते हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या किराणा घराण्यातील एक महान गायक आणि प्रसिद्ध नाटककार होते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १८८६ रोजी हुबळीजवळील कुंदगोळ या गावी झाले. त्यांच्या कुटुंबात संगीताची कोणतीही पार्श्वभूमी नव्हती, परंतु त्यांची संगीतावर गाढ श्रद्धा होती. त्यांनी उस्ताद अब्दुल करीम खां यांच्याकडे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे कठीण आणि कठोर शिक्षण घेतले. ते किराणा घराण्याचे प्रमुख आणि निष्णात गायक म्हणून ओळखले जाऊ लागले.



संगीताचा अभ्यास पूर्ण झाल्यावर ते काही नाटक कंपन्यांमध्ये सामील झाले आणि मराठी संगीत रंगभूमीवर आपले वेगळे आणि मोठे स्थान निर्माण केले. पंडित सवाई गंधर्व यांनी भारतीय संगीतसृष्टीला अनेक हिरे दिले. यामध्ये भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, भारतरत्न गानकोकिळा लता मंगेशकर, गंगूबाई हंगगल फिरोज दस्तूर यांचा समावेश आहे. रामचंद्र गणेश कुंदगोळकर (सवाई गंधर्व) हे हिदुस्थानी शास्त्रीय संगीत गाणारे गायक हे गंधर्व परंपरेतील एक गायक होते. रामभाऊंच्या कुटुंबात संगीताची विशेष पार्श्वभूमी नसताना त्यांनी संगीतामध्ये रुची वाढविली आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाला उस्ताद अब्दुल करीम खान यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ केला. तेथील अभ्यास पूर्ण केल्यानंतर रामभाऊंनी एका नाटक कंपनीत सामील झाले आणि थोड्याच काळात मराठी रंगभूमीवर त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. नारायण श्रीपाद राजहंस यांना ज्याप्रमाणे लोक बालगंधर्व म्हणून ओळखू लागले, त्याचप्रमाणे रामभाऊ कुंदगोळकरांना लोक सवाई गंधर्व या नावाने ओळखू लागले. त्यांनी गायलेली मराठी नाट्यसंगीतातील काही पदे अजरामर झाली.

व्यक्तीच्या गुणवत्तेचा खरा कस अनेक ठिकाणी लागतो, त्यातील सर्वाधिक उच्च दर्जाची कसोटी म्हणजे ती व्यक्ती इतरांमध्ये असलेल्या गुणवत्तेला कसे फुलविते, त्यांना कसा वाव देते व मार्गदर्शन करते. सवाई गंधर्व या मूल्याधारित कसोटीवर सर्वाधिक खरे उतरले आहेत. किराणा घराण्याची परंपरा यशस्वीरीत्या पुढे नेणाऱ्या आणि अधिकच उजळविणाऱ्या त्यांच्या शिष्यपरंपरेतील गायक/गायिकाच नव्हे तर संपूर्ण भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्र आज त्यांचे ऋणी आहे. सवाई गंधर्वांच्या शिष्यांपैकी काही नावे म्हणजे भीमसेन जोशी, बसवराज राजगुरू, गंगूबाई हानगल वगैरे. यापैकी पंडित भीमसेन जोशी यांनी पुण्याला त्यांच्या गुरूंच्या स्मरणार्थ दरवर्षी होणारा सवाई गंधर्व संगीत महोत्सव सुरू केला. रामभाऊंच्या कुटुंबात संगीताची विशेष पार्श्वभूमी नसताना त्यांनी संगीतामध्ये रुची वाढविली आणि उस्ताद अब्दुल करीम खान यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या अभ्यासाला प्रारंभ केला. तेथील अभ्यास पूर्ण केल्यानंतर रामभाऊ एका नाटक कंपनीत सामील झाले आणि थोड्याच काळात मराठी रंगभूमीवर त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. नारायण श्रीपाद राजहंस यांना ज्याप्रमाणे लोक बालगंधर्व म्हणून ओळखू लागले, त्याचप्रमाणे रामभाऊ कुंदगोळकरांना लोक सवाई गंधर्व या नावाने ओळखू लागले. त्यांनी गायलेली मराठी नाट्यसंगीतातील काही पदे अजरामर झाली आहेत.मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी त्यांची सांगीतिक कारकीर्द नाट्यकला प्रवर्तक नाटक मंडळीत बाल गायक-नट म्हणून सुरू केली होती. तिथे त्यांना काही काळ सवाई गंधर्वांकडून नाट्य संगीताचे प्राथमिक मार्गदर्शन लाभले. त्यावेळी सवाई गंधर्व हे नाटक दौऱ्यांमध्ये अत्यंत व्यस्त असल्यामुळे मास्तरांनी पं. भास्करबुवा बखले यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे समग्र शिक्षण घेतले. अशा या भारतरत्न घडविणाऱ्या महान गायकाचे निधन २ सप्टेंबर १९५२ रोजी त्यांचे झाले. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी पुण्यात प्रसिद्ध 'सवाई गंधर्व संगीत महोत्सव' आयोजित केला जातो, ज्याची देशातील सर्व संगीतप्रेमी आतुरतेने वाट पाहतात.

## सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये तान्हा पोळ्यानिमित्त बैल सजावट स्पर्धेचे आयोजन



प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**अकोट :** आकोट तांदुळवाडी फाटा स्थित सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये ०९ रोजी प्री प्रायमरी च्या विद्यार्थ्यांसाठी बैल सजावट स्पर्धा घेण्यात आली. याकरिता संस्थेचे अध्यक्ष नवनीतील लखोटिया, लुनकरण डागा ,प्रमोद चांडक ,शारदा लखोटिया ,सुधा डागा, रेखा चांडक, दीपम लखोटिया, प्रा. कविता मिश्रा, अभिषेक गुजर, मयुरी गोळे, माधुरी टिकार व गौरव काळे मंचावर उपस्थित होते . कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले त्यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. या स्पर्धेचे परीक्षण कला विभाग प्रमुख माधुरी टिकार व गौरव काळे यांनी करून प्रत्येक वर्गातून तीन क्रमांक देण्यात आले विजयी स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी रूपाली कुठे यांनी पोळा विषयी माहिती सांगितली. प्रा.कविता मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना बैलपोळा का साजरा करतात व शेतकऱ्यांसाठी बैलाचे महत्त्व सांगून सर्वांना बैलपोळ्याच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे यशस्वी ते करिता पुनम मोरखडे,मयुरी गोळे, सिद्धार्थ अंभोरे ,वैशाली ढगे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .

## साहित्य परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती; विजय जितकर यांचा स्काऊट शिबिरात सन्मान



**अकोट :** शहरातील ज्येष्ठ समाजसेवक तथा स्काऊट्स अँड गाईड्सचे माजी सहाय्यक जिल्हा आयुक्त विजय धोंडूजी जितकर यांचा अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या स्काऊटच्या 'मास्टर प्रगत प्रशिक्षण' शिबिरात विशेष सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी त्यांची नियुक्ती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स अँड गाईड्स (मुंबई) यांच्या निर्देशानुसार अकोला भारत स्काऊट्स अँड गाईड्स जिल्हा कार्यालय आणि जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय मास्टर प्रगत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात जिल्ह्यातील ६५ स्काऊट मास्टर ट्रेनर्स सहभागी झाले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि.१२ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


RRC NETWORK

# रौप्य महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ!









# मुंबईतील अंगणवाड्यांचा कायापालट!

## 817 केंद्रे होणार हायटेक आणि सक्षम!

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई :** पोषण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी समाजातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात अंगणवाडीसेविका आणि मदतनीस यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या माध्यमातून बालके, गरोदर माता आणि स्तनदा मातांपर्यंत पोहोचून सुदृढ महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना उपदान (ग्रॅज्युइटी) देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेणार असल्याचे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प योजनेअंतर्गत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे 9व्या राष्ट्रीय पोषण माहाचा राज्यस्तरीय शुभारंभ मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाला. यंदाचा पोषण माह 'माझी अंगणवाडी, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित आहे. यावेळी महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, सहआयुक्त संगिता लोंढे, विजय क्षीरसागर, आयुषचे सहायक संचालक सुश्रुत मुक्कावार यांच्यासह विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी जन्मापासूनच योग्य पद्धतीने शिशु अभ्यंग मिळणे आवश्यक असून, त्यांचे महत्त्व मातांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयुष विभागाचा सहभाग घेण्यात आला आहे. आयुषच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका व



मदतनीसांना आवश्यक मार्गदर्शन देऊन ही माहिती मातांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. पोषण माहाच्या माध्यमातून बालके, गरोदर माता आणि स्तनदा मातांच्या आहार व आरोग्याबाबत जनजागृती करण्यासोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत आहे. यासाठी महिला व बालविकास, आरोग्य आणि आयुष विभागाने समन्वयाने काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यंदाच्या 'माझी अंगणवाडी, माझी जबाबदारी' या संकल्पनेतून अंगणवाडी केंद्रे अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे.

डिजिटल अंगणवाड्यांमधील स्क्रीनवर आयुष विभागाने तयार केलेले आरोग्य व पोषणविषयक व्हिडिओ नियमितपणे दाखवावेत आणि त्यातील माहिती गरोदर व स्तनदा मातांपर्यंत पोहोचवावी, अशी सूचना मंत्री आदिती तटकरे यांनी केली.

सक्षम अंगणवाडी प्रकल्प योजनेअंतर्गत स्नेहा सामाजिक संस्था आणि एकात्मिक बालविकास सेवा यांच्यात करार करण्यात आला. या करारानुसार मुंबईतील 817 अंगणवाड्या आवश्यक सोयी-सुविधांनी सुसज्ज करून सक्षम करण्यासाठी काम केले जाणार आहे. कार्यक्रमात आयुषच्या डॉ. शुभांगी ठाकूर यांनी बालकांचा मसाज व काळजी याबाबत सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन केले. आरसीएचच्या डॉ. उपाली वाघमारे यांनी 'अनिमिया' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी आयुक्त माधवी सरदेशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या एकात्मिक बालविकास सेवेच्या रंगीत लोगोचे, वेबपेजचे आणि 'पोषण आहार प्रार्थने'चे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

# गणेश मंडळांना FDA च्या नियमांचा फटका! प्रसादाचेही घ्यावे लागणार बिल!

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांसाठी अन्न सुरक्षेशी संबंधित नियम अधिक कडक करण्यात आले आहेत. मुंबईतील सुमारे 12,000 सार्वजनिक गणेश मंडळांना अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) नोंदणी करावी लागणार आहे. तसेच प्रसाद किंवा सामुदायिक जेवणासाठी वापरण्यात येणाऱ्या अन्नपदार्थांची खरेदी करताना बिल आणि संबंधित विक्रेत्याची FSSAI नोंदणीची माहिती जतन करावी लागणार आहे.

यासंदर्भात एफडीएच्या अधिकाऱ्यांनी गणेश मंडळांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. या बैठकीत प्रसाद आणि सामुदायिक भोजन तयार करताना कोणत्या नियमांचे पालन करावे लागेल, याबाबत मंडळांना माहिती देण्यात आली. लहान-मोठ्या सर्व मंडळांना हे नियम लागू असतील, असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

नियमांनुसार, प्रसादासाठी वापरले जाणारे दूध, धान्य, भाजीपाला किंवा इतर अन्नपदार्थ FSSAI नोंदणीकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे लागतील. या खरेदीची बिलं मंडळांना जपून ठेवावी लागणार आहेत. त्यामुळे मंडळांनी अन्नपदार्थ खरेदी करताना विक्रेत्याची नोंदणी आणि आवश्यक कागदपत्रे तपासणं गरजेचं आहे. या नियमांमुळे विशेषतः लहान गणेश मंडळांसमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक लहान मंडळे व्यावसायिक केटरर्सऐवजी स्थानिक स्वयंसेवकांच्या मदतीने प्रसाद किंवा जेवण तयार करतात. त्यामुळे नवीन नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी आणखी वेळ द्यावा, अशी मागणी काही मंडळांच्या प्रतिनिधींनी केली होती. मात्र, यावर्षीपासूनच नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रसाद किंवा अन्नपदार्थ कोणी दान केले तरी त्याची नोंद ठेवावी लागणार आहे. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने ५० किलो लाडू दान केले असल्यास ते कोणी दिले आणि ते कुठे तयार करण्यात आले, याची माहिती मंडळाकडे असणं आवश्यक असेल.

# सायबर ठगांचे जाळे उद्ध्वस्त; 350 कोटींच्या फसवणुकीचा पर्दाफाश!

## मुंबई क्राईम ब्रँचची मोठी कारवाई

राजेश जायस्वाल १२ सप्टेंबर



**मुंबई:** मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने (क्राइम ब्रँच युनिट ५) एका मोठ्या देशव्यापी सायबर फसवणुकीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला असून तिघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे इस्लामुद्दीन सलीमुद्दीन शेख, यासिर नासिरुद्दीन शेख (४२), आणि अब्दुल रज्जाक, अब्दुल रऊफ अशी आहेत.

मुंबई गुन्हे शाखेचे उपायुक्त (डीसीपी) राजतिलक रोशन यांनी शुक्रवारी दिलेल्या माहितीनुसार, ही टोळी सायबर फसवणुकीतून मिळवलेली रक्कम वळवण्यासाठी बनावट सिम कार्ड्स आणि इतरांच्या नावावर उघडलेल्या बँक खात्यांचा वापर करत असे. आतापर्यंतच्या तपासात ३५० कोटी रुपयांहून अधिकचे बेकायदेशीर आर्थिक व्यवहार उघडकीस आले आहेत. न्यायालयाने या तिन्ही आरोपींना १९ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

तपासात असे समोर आले की, या टोळीची कार्यपद्धती प्रामुख्याने सामान्य नागरिक आणि आपल्या साथीदारांच्या नावावर बँक खाती उघडणे, तसेच बनावट कागदपत्रांचा वापर करून विविध टेलिकॉम कंपन्यांकडून सिम कार्ड्स मिळवणे यावर आधारित होती. खाती उघडल्यानंतर, आरोपी खातेदारांची पासबुके, चेकबुक्स, सक्रिय एटीएम कार्ड्स, सिम कार्ड्स आणि मोबाइल बँकिंगसाठी आवश्यक कागदपत्रे स्वतःच्या ताब्यात घेत असत. त्यानंतर, देशभरातून सायबर फसवणुकीद्वारे मिळवलेली रक्कम या खात्यांमध्ये वळवली जात असे. एकदा का पैसे खात्यात जमा झाले की, पैशांचा मूळ स्रोत लपवण्यासाठी ते त्वरित इतर बनावट खात्यांमध्ये हस्तांतरित केले जात असत.

या रॅकेटबाबत गुप्त माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने तांत्रिक तपास सुरू केला. संशयास्पद हालचाली आणि बँक व्यवहारांच्या माहितीवरून आरोपींची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर त्यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करण्यात आली. मालाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर या तिन्ही आरोपींना अधिकृतपणे अटक करण्यात आली. आरोपींच्या ठिकाणांवर टाकलेल्या छाप्यांदरम्यान पोलिसांनी ८८ बँक पासबुके, १४३ चेकबुक्स, १०० एटीएम कार्ड्स, २४ मोबाइल फोन, १६७ सक्रिय सिम कार्ड्स, दोन लॅपटॉप आणि बँकिंगशी संबंधित इतर महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली.

तांत्रिक तपासादरम्यान या रॅकेटबाबत एक महत्त्वाची बाब समोर आली. पोलिसांच्या माहितीनुसार, या टोळीने केवळ १० मुख्य बँक खात्यांचा वापर करून २४ कोटी रुपयांहून अधिकची सायबर फसवणूक केली होती. या १० खात्यांविरुद्ध 'नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल' आणि १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर आधीच ३२ तक्रारी नोंदवण्यात आल्या होत्या. या खात्यांशी संबंधित व्यवहार आणि मोबाईल क्रमांकांची तपासणी केल्यावर पोलिसांना असे आढळून आले की, या संपूर्ण नेटवर्कमध्ये २,८९८ सिम कार्ड्सचा वापर करण्यात आला होता. या सिम कार्ड्सच्या पुढील तपासणीतून ३५० कोटी रुपयांचे सायबर फसवणुकीचे रॅकेट उघडकीस आले. या नेटवर्कमध्ये आणखी किती लोक सामील आहेत, हे शोधण्यासाठी गुन्हे शाखा आता अटक केलेल्या व्यक्तींची चौकशी करत आहे.

ही कारवाई मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रौशन आणि सहायक पोलीस आयुक्त (मध्य) सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कक्ष-५च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोहिणी पोतदार, पोलीस निरीक्षक रविंद्र तेलतुंबडे यांच्यासह धनराज चौधरी, सचिन बाराते, इंगोले, नितीन पालांडे, अजय पोवार, महेश अंजनवाड, अंकुश न्यायनिर्गुणे आणि पथकातील अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

# पायधुनी परिसरात ड्रग्ज तस्करी उघड; तिघांवर गुन्हा दाखल



प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई :** एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जची विक्री करणाऱ्या तिघांना पायधुनी पोलिसांनी अटक केली. आरोपींकडून ४३५.१० ग्रॅम मेफेड्रोन, अंदाजे १३ लाख ५ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच उल्हासनगर येथील एका घरातून एमडी ड्रग्ज तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्यही पोलिसांनी जप्त केले.

पायधुनी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी गस्त घालत असताना मस्जिद बंदर पश्चिम येथील जंजिकर स्ट्रीट परिसरात कारवाई करण्यात आली. यावेळी एमडी बाळगल्याच्या संशयावरून कपिल गुलशन अरोरा (३९), मोहम्मद आसीफ इक्बाल शेख (४४) आणि सईद अस्लम शेख (३३) यांना अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपींकडून एकूण ४३५.१० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. पुढील तपासात आरोपींचे उल्हासनगर येथील घर असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथेही कारवाई केली.

या ठिकाणाहून ड्रग्ज निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सहआयुक्त डॉ मनोजकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, पोलीस उपायुक्त रागसुधा आर. आणि सहाय्यक पोलीस आयुक्त रेणुका बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे, पोलीस निरीक्षक अजय कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण मांढरे यांच्यासह पथकाने या कारवाईत सहभाग घेतला. या कारवाईमुळे एमडीच्या विक्रीसोबतच त्याच्या कथित निर्मितीच्या साखळीवरही पोलिसांनी कारवाईचा फास आवळल्याचे स्पष्ट झाले आहे.

# एमडीएमएची तस्करी करणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाने (एएनसी) जोगेश्वरी परिसरात मोठी कारवाई केली आहे. एमडी आणि एमडीएमए पिल्स या अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून १ कोटी २६ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, आझाद मैदान युनिटचे पथक ११ सप्टेंबर, रोजी जोगेश्वरी परिसरात गस्त घालत असताना, एक इसम त्याच्या राहत्या घरातून अंमली पदार्थांची विक्री करत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने आक्सा मशीद रोड, जोगेश्वरी (प.) येथे आरोपीच्या घरावर छापा टाकला. आरोपीच्या अंगझडतीत २१० ग्रॅम एमडी आणि ३ एमडीएमए गोळ्या, तर घरझडतीत २०७ ग्रॅम एमडी आणि रोख रक्कम मिळून आली आहे.

# गणेशोत्सवात पालिकेची पर्यावरणीय क्रांती!

## 'प्रसाद ते ऊर्जा' उपक्रम सुरु!

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई:** गणेशोत्सवातील कचऱ्याचे शाश्वत व शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेने 'लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'च्या समन्वयाने अभिनव 'प्रसाद ते ऊर्जा' उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मंडळाच्या प्रसाद कक्ष व अन्नछत्रामधून निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर बायोमिथेनेशन प्रक्रियेद्वारे शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत मंडळाच्या प्रसाद वितरण आणि भोजन सुविधांमधून दररोज सुमारे ८ ते १० मेट्रिक टन शुध्द अन्न व जैविक कचरा निर्माण होण्याचा अंदाज आहे. या कचऱ्याचे निर्मितीस्थळी योग्य विलगीकरण करून, समर्पित वाहनांद्वारे तो महानगरपालिकेच्या नायर रुग्णालय, कस्तुरबा रुग्णालय, जीटीबी रुग्णालय आणि शीव रुग्णालय येथील बायोमिथेनेशन प्रकल्पांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या नायर रुग्णालय, कस्तुरबा रुग्णालय, जीटीबी रुग्णालय आणि शीव रुग्णालय येथील बायोमिथेनेशन प्रकल्पांतील प्रत्येक प्रकल्पाची प्रक्रिया क्षमता सुमारे २ मेट्रिक टन प्रतिदिन आहे. या उपक्रमांतर्गत ११ दिवसांत सुमारे ८० मेट्रिक टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून अंदाजे ७ हजार ७४४ युनिट नवीकरणीय वीज निर्माण करण्याचे नियोजन आहे. प्रत्यक्ष वीज निर्मिती ही विलगीकृत कचऱ्याचे प्रमाण व गुणवत्ता तसेच प्रकल्पांच्या कार्यस्थितीवर अवलंबून राहील. निर्माण होणारी वीज रुग्णालयांतील रुग्ण कक्ष, मार्गिका आणि अन्य सामायिक परिसरातील प्रकाशव्यवस्थेसह योग्य कामांसाठी वापरण्यात येणार आहे. हा उपक्रम उपायुक्त (परिमंडळ-२) आणि उपायुक्त (घनकचरा-व्यवस्थापन) यांच्या निर्देशानुसार तसेच एफ/दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. महानगरपालिकेने नियुक्त केलेली 'एरोकेअर एव्हिएशन प्रा.लि' ही संस्था या प्रकल्पांचे परिचालन व देखभाल करीत आहे. मोठ्या सार्वजनिक उत्सवांमध्ये निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे योग्य विलगीकरण आणि शास्त्रोक्त प्रक्रिया करून त्यापासून उपयुक्त ऊर्जा निर्माण करता येते, हे या उपक्रमातून अधोरेखित होणार आहे.



# पोलिसांची मोठी कारवाई: 35 गुन्हे दाखल असलेला आरोपी पिस्तूलसह अटकेत

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई:** अवैध शस्त्र बाळगणाऱ्या सराईत आरोपीविरुद्ध वनराई पोलिसांनी कारवाई करत विनापरवाना पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे जप्त केली. रोहित अविनाश सावंत (३६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध यापूर्वी ३५ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, ९ सप्टेंबर २०२६ रोजी वनराई पोलिसांच्या ए.टी.सी. पथकाला आरोपी अवैध शस्त्र घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी गोरेगाव पूर्व येथील पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दक्षिण वाहिनीवरील शिवधाम हिंदू स्मशानभूमीबाहेर सापळा रचला. या कारवाईदरम्यान संशयित रोहित सावंत याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे विनापरवाना पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी सुमारे ५५ हजार रुपये किमतीचे पिस्तूल आणि तीन हजार रुपये किमतीची तीन जिवंत काडतुसे, असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीकडे शस्त्र बाळगण्यासाठी कोणताही वैध परवाना नसल्याचे तपासात समोर आले. याप्रकरणी भारतीय हत्यारबंदी कायदा तसेच मुंबई पोलीस आयुक्तांच्या हत्यारबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर आरोपीने हे अवैध शस्त्र कोणत्या उद्देशाने बाळगले होते, तसेच त्याचा अन्य गुन्ह्यांशी काही संबंध आहे का, याचा तपास वनराई पोलीस करत आहेत.

या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अब्दुल रऊफ शेख, पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र पोस्टुरे, पोलीस निरीक्षक संदीप वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# लालबागच्या राजाचे दिव्य दर्शन; बाप्पाची मनमोहक छबी पाहून भक्त भावविभोर

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई :** मुंबईसह संपूर्ण देशभरात गणेशोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मुंबईतील सर्वात प्रसिद्ध आणि लोकप्रिय गणपती मंडळ असलेल्या 'लालबागचा राजा'ची पहिली झलक शुक्रवार, (११ सप्टेंबर) रोजी संध्याकाळी ७ वाजता दाखवण्यात आली आहे. 'लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ' यंदा आपल्या ९३ व्या गणेशोत्सवाचे आयोजन करत आहे. या मंडळाची स्थापना १२ सप्टेंबर १९३४ रोजी करण्यात आली होती. 'लालबागचा राजा'च्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविकांची गर्दी होते आणि यंदाही 'राजा'च्या भक्तांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. आज बाप्पाचे दिव्य दर्शन होताच भाविक भारावून गेले. पहिल्या दर्शनानंतर भाविकांसाठी गणेश चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच (१४ सप्टेंबर) पासून 'लालबागचा राजा'च्या नियमित दर्शनाची व्यवस्था सुरू करण्यात येणार आहे.



लालबागचा राजा हा नवसाचा गणपती म्हणून ओळखला जातो आणि अशी मान्यता आहे की, 'लालबागचा राजा'च्या दरबारात पूर्ण श्रद्धाभावाने मागितलेला प्रत्येक नवस पूर्ण होतो, त्यामुळे देशभरातून भाविक येथे दर्शनासाठी येतात.

लालबागचा राजा'च्या भव्य तयारीला ९ जून २०२६ रोजी आयोजित श्री गणेश मुहूर्त पूजनाने सुरुवात झाली होती. यंदा बाप्पाच्या दरबारात प्रवेशासाठी मंडपाच्या मुख्य प्रवेशद्वाराला भव्य आणि दिव्य मंदिराचे रूप देण्यात आले आहे. मंदिरासारखी ही भव्य रचना मंडपासमोर येताच भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. यंदा 'लालबागचा राजा'च्या पंडालमध्ये प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेला विशाल त्रिशूळ हा आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू ठरला आहे.

रामेश्वरम ज्योतिर्लिंग मंदिराच्या धर्तीवर बनवलेली रचना आणि त्रिशुळाच्या संयोजनातून यंदाची संपूर्ण सजावट भगवान शिव (महाकाल) आणि शिवतत्त्व या संकल्पनेवर आधारित करण्यात आली आहे. ११ दिवसांचा हा महापर्व शुक्रवार, (२५ सप्टेंबर २०२६) रोजी अनंत चतुर्दशीला, म्हणजेच १२ व्या दिवशी गणपती बाप्पाच्या विसर्जनाने संपन्न होणार आहे.

# MPSC पेपरफुटी प्रकरण तापले; आदित्य ठाकरे यांची राज्यपालांकडे मागणी

प्रतिनिधी १२ सप्टेंबर

**मुंबई:** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना अध्यक्ष, आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची भेट घेतली.या भेटीत पेपरफुटीप्रकरणी न्यायालयीन चौकशी करावी तसेच एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव यांनी राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्या मांडण्यात




आल्या. पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम होत असून, या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी शिष्टमंडळाने राज्यपालांकडे केली.

राज्यपालांनी शिष्टमंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले असून, या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेण्याचे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले. एमपीएससी परीक्षांच्या पारदर्शकतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135